


# उन्नती

लॉईड्स इंफिनाईट फाऊंडेशनचे माहितीपत्र

तिसरी आवृत्ती- डिसेंबर, 2024


# लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन 3.0
# सामाजिक सक्षमीकरणाचा आणि सर्वांगीण विकासाचा प्रेरणादायी प्रवास

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (LIF) ने LIF 3.0 या CSR उपक्रमांतर्गत ग्रामीण आणि आदिवासी भागांतील लोकांचे जीवन उन्नत करण्याचा एक आदर्शच निर्माण केला आहे. शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक परंपरा, पायाभूत सुविधा, आणि महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील समाजाच्या विकासासाठी भरीव योगदान दिले आहे.






## शिक्षण : उज्ज्वल भविष्यासाठी आशेचा किरण

- सर्वांसाठी शिक्षण हे LIF चे मुख्य ध्येय आहे. 14 नोव्हेंबर 2024 रोजी आदिवासी गावांमध्ये बालदिन साजरा करताना, ‘माझी शाळा, सुंदर शाळा’ या विषयावर चित्रकला स्पर्धा आणि प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 101 मुलांनी सहभाग घेतला आणि त्यांना शाळेच्या दप्तरांसह फराळाचे वितरण करण्यात आले.
- यात सात जिल्हा परिषद शाळांतील 575 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरित केले. चंद्रपूर येथील जी डी गोयंका लॉईड्स पब्लिक स्कूल विद्यार्थ्यांना गुणवत्ता-आधारित CBSE शिक्षण देत आहे. कौशल्यविकास कार्यक्रमांतर्गत, LIF ने ‘प्रथम’ NGO च्या सहकार्याने तरुणांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रशिक्षण दिले.

## सांस्कृतिक परंपरा : वारसा जपणारा उपक्रम

- 15 नोव्हेंबर 2024 रोजी बिरसा मुंडा जयंती निमित्त आदिवासी वारसा आणि स्वातंत्र्यसैनिकांचा गौरव करण्यात आला.
- दिवाळीच्या सणादरम्यान वंचित कुटुंबांना आवश्यक वस्तू आणि मिठाईचे वाटप करण्यात आले.

## क्रीडा आणि सामाजिक एकत्रिकरण

- लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीने गडचिरोलीतील खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे. हेडरी येथे अत्याधुनिक क्रीडा सुविधांचे उद्घाटन होणार असून स्थानिक खेळाडूंना आता अधिकाधिक संधी मिळणार आहेत.

## पायाभूत सुविधा आणि शाश्वतता : परिवर्तनशील प्रकल्प

- पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी मंगर आणि हेडरी तलाव पुनरुज्जीवन, LED स्ट्रीटलाइट्स, विहिरी, हँडपंप, आणि वीज प्रकल्पांचे काम हाती घेतले आहे. स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यावर भर देण्यात आला.

## आरोग्यसेवा : सामाजिक स्वास्थ्याची काळजी

- आरोग्य सेवेसाठी LIF ने 1 ऑक्टोबर 2024 रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले, ज्यामध्ये 49 दात्यांनी रक्तदान करून आपले योगदान दिले.
- महावीर सेवा सदन समितीच्या सहकार्याने आयोजित कृत्रिम अवयव आणि दृष्टीसहाय्यक शिबिरात 780 लोकांना लाभ मिळाला.
- लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलने 100 यशस्वी प्रसूतींचा टप्पा गाठला असून कुपोषण, क्षयरोग, आणि कर्करोगासारख्या समस्या हाताळण्यासाठी जागरूकता कार्यक्रम राबवले.






## सर्वांगीण प्रगतीसाठी एकत्र वाटचाल

- लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या विविधांगी उपक्रमांनी आत्मनिर्भर, आणि शाश्वत भविष्याची आशा ग्रामस्थांच्या जनमानसात निर्माण केली आहे.
- महिला सक्षमीकरण, शिक्षण, शेतकऱ्यांचे उत्थान, आणि पायाभूत सुविधांच्या उभारणीसह, ग्रामीण आणि आदिवासी भागांशी घट्ट नाते जोडले आहे.
- सातत्यपूर्ण सहयोग आणि सर्वांच्या प्रयत्नांतून LIF ही एव्हाना समाजाच्या सर्वांगीण विकासाची दिशा दाखवणारी प्रेरणा म्हणून नावारूपाला आलेली आहे.

## महिला आणि शेतकऱ्यांचे सक्षमीकरण

- आदिवासी लक्ष्मी महिला बचत गटाच्या (SHG) महिलांना दिवाळीच्या वेळी त्यांच्या हस्तनिर्मित उत्पादने विक्रीसाठी मंच उपलब्ध करून दिला. तीन दिवसांत महिलांनी ₹56,000 ची विक्री केली.
- शेतकऱ्यांसाठी जैन इरिगेशनच्या अभ्यास दौऱ्याद्वारे ठिबक सिंचन आणि पिक व्यवस्थापन यांसारख्या तंत्रज्ञानाची माहिती दिली.

## संदेश व्यवस्थापकीय संचालकांच्या डेस्कवरून...



**नमस्कार,**

‘उन्नती’ च्या या प्रवासात पुढे जात असताना, आपण आजवर केलेल्या प्रगतीबद्दल मला अपार अभिमान, समाधान आणि कृतज्ञता वाटते. गडचिरोलीला आधुनिक स्टील सिटीमध्ये रूपांतरित करण्याचे आपले ध्येय हे केवळ शहराच्या औद्योगिक विकासापुरते मर्यादित नाही. येथील स्थानिक सर्व समाजाच्या सर्व वर्गांचा सर्वांगीण विकास व्हावा हेच आपले उन्नत ध्येय आहे आणि त्यादृष्टीनेच आपण प्रयत्न करतो आहोत. पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, आणि शैक्षणिक क्षेत्राच्या विकासकार्यांमध्ये आपण उल्लेखनीय अशी प्रगती करत आहोत. परिणामी, आपल्या कार्यक्रमांचा लाभ हा सर्वांपर्यंत पोहोचत आहे.

लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल म्हणजे या यशोगाथेचा एक सबळ असा पुरावाच म्हणावा लागेल. आतापर्यंत 63,000 हून अधिक रुग्णांचे उपचार आणि 100 बाळांचे जन्म या रुग्णालयात पार पडले आहेत. या कार्यांतून येथील जनतेला दर्जेदार आरोग्यसेवा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेची साक्षच पटते. मात्र, ही तर केवळ एक सुरुवात आहे! आम्ही आमचे प्रयत्न अधिकाधिक वाढवत आहोत. उच्च दर्जाची आरोग्यसेवा ही सर्वांसाठी, आणि सहज उपलब्ध व्हावी हेच आमचे ध्येय आहे.

त्याचप्रमाणे, लॉईड्स राज विद्या निकेतन येथील पुढच्या पिढ्यांचे उज्ज्वल भविष्यातील घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मूल्याधिष्ठित CBSE शिक्षणाच्या माध्यमातून आम्ही नव्या पिढीला ज्ञान व कौशल्यांनी सक्षम करत आहोत. हीच सर्वगुणसंपन्न आणि सक्षम नवीन पिढी या भागाच्या भविष्यातील प्रगतीचे नेतृत्व करणार आहे.

आमच्या कार्यक्षेत्राचा विस्तार करताना आम्ही स्थानिक जनतेसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करत आहोत. हे रोजगार शाश्वत आणि समृद्ध भविष्य निर्माण करतील हा विश्वास आम्हाला आहे. ‘उन्नती’ हा एक सामूहिक प्रयत्न आहे आणि या माध्यमातून एकत्रितपणे आपण गडचिरोलीसाठी उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करत आहोत.

आपल्या सर्वांसाठी 2025 हे नवीन वर्ष समृद्धी, आरोग्य आणि समाधानाने भरलेले जावो, अशा माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा! येणारे वर्ष आपल्यासाठी अधिक प्रगती आणि सकारात्मक बदल घेऊन येवो.

**आपला,**
**बी. प्रभाकरन**
**व्यवस्थापकीय संचालक**
**लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड**

## संदेश संपादकाच्या डेस्कवरून...



**प्रिय वाचकहो,**

सणांचा आणि उत्सवाचा हा काळ तुम्ही नक्कीच आनंदात आणि उत्साहात साजरा केला असणार! आपल्या सगळ्यांची सामुदायिक प्रगती आणि आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे हेच आमचे ध्येय आहे. यासाठी तुमचे पाठबळ हे आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

‘उन्नती’ म्हणजेच प्रगती! सर्वांनी एकत्र येऊन केलेल्या सामूहिक प्रयत्नांची ताकद आपल्याला ‘उन्नती’ च्या वाटचालीतून दिसून येते. ‘उन्नती’ च्या या अंकामध्ये आपण खंबीरपणा आणि यशाच्या प्रेरणादायक कथा प्रस्तुत करत आहोत. तसेच भविष्यातील घडामोडींमध्ये महिलांचा आणि तरुणांचा वाढता सहभागही उलगडत आहोत. त्यांचे नेतृत्व, खेळांप्रती असलेली आवड आणि कार्याप्रती समर्पण यांमुळे संघभावना, शिस्त आणि चिकाटीने कार्य करण्याची प्रेरणा सर्वांनाच मिळेल.

शिक्षण, आरोग्यसेवा आणि सामाजच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ‘उन्नती’ च्या या अंकाच्या माध्यमातून तुम्हीसुद्धा घडलेले हे बदल अनुभवून पहा आणि अधिक मजबूत व समृद्ध भविष्य घडविण्यासाठी आपले योगदान सुरू ठेवण्यासाठी कृतसंकल्प व्हा!

तुमच्यासाठी 2025 हे येणारे वर्ष आनंददायी आणि यशस्वी जावो, ही शुभेच्छा!
वाचनाचा आनंद घ्या!

**आपली**
**कीर्ती रेड्डी**
**संपादक, उन्नती**

CMYK

# शेतकऱ्यांचे सबलीकरण: लॉईड्सकडून पांढरकवड्यात कृषी मेळावा








ग्रामीण सक्षमीकरण आणि कृषी विकासासाठी कटिबद्ध असलेल्या लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या वतीने 23 सप्टेंबर 2024 रोजी पांढरकवडा येथे भव्य कृषी मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याच्या माध्यमातून परिसरातील 11 गावांमधून आलेले 1,258 शेतकरी एकत्र आले आणि त्यांना शेती सुधारण्यासाठी आवश्यक संसाधने व मार्गदर्शन एकत्रितपणे उपलब्ध करून दिले गेले.

शाश्वत शेतीचा विकास हे लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनसाठी नेहमीच महत्त्वाचे ध्येय राहिलेले आहे. पांढरकवड्यातील हा कृषी मेळावा म्हणजे या ध्येयाची पूर्ती करणारे एक यशस्वी आयोजन ठरले. मठारादेवी, उषगाव, नकोडा, आणि शेगाव मुर्शा अशा गावांतील शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त साहित्य किट व घरगुती बागायती किट वितरित करण्यात आले.

याशिवाय, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विशिष्ट समस्यांवर उपाय सुचवण्यासाठी मार्गदर्शक सत्रांचे आयोजन करण्यात आले. कापूस आणि सोयाबीन शेतीवरील झालेल्या सत्रांमध्ये तज्ज्ञांनी अधिक उत्पादन घेण्यासाठी उत्तम तंत्रज्ञान व मातीच्या आरोग्याचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण कसे करावे, पाणी बचतीसाठी प्रभावी सिंचन तंत्रे कोणती आणि पीकवाढीसाठी नॅनो युरिया डीएपीसारख्या नाविन्यपूर्ण उपायांचा उपयोग कसा करावा यावरही सविस्तर चर्चा झाली.

सरकारी योजना व आर्थिक पाठबळ याबद्दल माहिती देऊन शेतकऱ्यांना सक्षमीकरणासाठी मदत करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी आवश्यक संसाधनांचा आणि शासकीय योजनांचा पुरेपूर लाभ आता घेता येणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांना ज्ञान आणि साधने पुरवून, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन ग्रामीण कृषी क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणते आहे. कृषी मेळाव्यामुळे शाश्वत शेतीच्या पद्धतींना प्रोत्साहन मिळाले, तसेच आधुनिक शेतीतील नवकल्पनांशी शेतकऱ्यांचा परिचय झाला.

## परिवर्तनाची नांदी : शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन शेतकरी होणार अधिक सक्षम



स्थानिक शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाची नवनवीन साधने निर्माण करण्याच्या दृष्टीने लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन अनेक उपक्रम राबवत असते. या उपक्रमांनी स्थानिक शेतीत अनेक सकारात्मक बदल घडवले आहेत. आता ग्रामीण घरांमध्ये सुद्धा किचन गार्डनिंगचा उपक्रम लोकप्रिय झाला आहे. CSR टीमच्या मदतीने, आता गावकरी त्यांच्या अंगणात रसायनमुक्त भाज्या पिकवत आहेत. परिणामी, त्यांना चांगले पोषण मिळत आहे. कुटुंबांसाठी अतिरिक्त उत्पन्न मिळवता येत आहे.








या उपक्रमांतर्गत, गावकऱ्यांना विविध भाज्यांच्या बियाणांचा पुरवठा केला जातो. यात काकडी, तीळ, भोपळा, गुळवेल, दुधी, आणि पालक यांचा समावेश आहे. CSR टीम केवळ बियाणेच पुरवत नाही, तर पीक कसे घ्यावे आणि उत्तम दर्जेदार पीक कसे मिळवावे याचे मार्गदर्शन देखील करते. जेव्हा भाज्या पिकतात, तेव्हा LIF त्या शेतकऱ्यांकडून बाजारभावात खरेदी करते, ज्यामुळे शेतकऱ्यांना नियमित उत्पन्न मिळवता येते.



या शेतकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाशी परिचित करण्यासाठी, फाउंडेशनने त्यांना बँक खाते उघडून दिले आहेत. त्यांना UPI द्वारे पेमेंट करण्याचे प्रशिक्षण दिले गेले आहे. सप्टेंबर ते नोव्हेंबर 2024 दरम्यान, 411 किलो भाज्यांची खरेदी करण्यात आली आहे. यामाध्यमातून शेतकऱ्यांना ₹18,200 रुपये निवळ उत्पन्न दिले गेले आहे. ताज्या पिकलेल्या भाज्या सुरजागड आयरन ओर माईन्सच्या कँटीनमध्ये देखील पुरविल्या जात आहेत, ज्यामुळे कामगारांना पौष्टिक आणि स्थानिक पद्धतीने मिळवलेल्या अन्नाची सुविधा उपलब्ध होत आहे. 'फार्म-टू-फोर्क' असा हा अभिनव उपक्रम स्थानिक शेतकऱ्यांना सक्षम बनवित आहे. लोकांसाठी आरोग्यदायक अन्न पर्याय देखील उपलब्ध करून देत आहे.

शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देऊन आणि थेट मदत पुरवून, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन शेतकरी आणि स्थानिक लोकांना आत्मनिर्भर बनवते आहे. ग्रामीण भागातील ताजे आणि पौष्टिक अन्न सर्वांना उपलब्ध होत आहे.

## आधुनिक शेती उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांना मिळाले भक्कम पाठबळ

शेतकऱ्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्यासाठी त्यांना उत्पन्नाची नवनवीन साधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी विविध कृषी उपक्रम राबविण्यात आले आहेत. या उपक्रमांमुळे आधुनिक शेती पद्धतीचे महत्त्व पटवून दिले जात आहे. एवढेच नव्हे तर स्थानिक शेतकरी आणि नागरिक यांच्या गरजेनुसार आवश्यक तसे बदल करून उपयुक्त उपक्रम आखण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांना ज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव मिळवून देण्यासाठी अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले. या दौऱ्यांमध्ये शेतकऱ्यांना पीक विविधीकरण, उन्नत बियाण्यांचा वापर व आधुनिक यंत्रसामग्रीचा लाभ याबद्दल मार्गदर्शन प्राप्त झाले. तज्ज्ञांशी संवाद साधण्याची मौल्यवान संधी मिळाली. नव्या तंत्रज्ञानाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जागरूकता वाढत आहे. परिणामी, त्यांचे शेतीतील कौशल्य सुधारत आहे.

याशिवाय, मधमाशीपालन कार्यक्रमांद्वारे शेतकऱ्यांना नवीन व्यवसाय सुरू करण्याचे प्रोत्साहन दिले जात आहे. गावांमध्ये शेतकऱ्यांना मधमाश्यांचे बॉक्स व प्रशिक्षण देण्यात आले असून, यामुळे त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होईल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

बांबू रोपवाटीकेचे वितरण व त्याचा वापर याबद्दल माहिती देऊन पर्यावरण पुनर्संचयनासाठी आणि दीर्घकालीन उत्पन्नासाठी प्रयत्न केले जात आहेत. बांबूपासून फर्निचर, अन्न व अन्य वस्तू तयार करता येतात. याचे रीतसर प्रशिक्षण दिल्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याची संधी प्राप्त झाली.











स्त्रियांचे सक्षमीकरण व पोषण सुधारण्यासाठी घरगुती बागायती प्रकल्प राबवले जात आहेत. महिलांना भाजीपाल्याच्या बियाण्यांचे वितरण करून घरच्या घरी ताज्या भाजीचे उत्पादन घेण्याची आणि उरलेला माल बाजारात विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याची संधी प्राप्त होते आहे.

तसेच, फळझाडांचे लागवड उपक्रम, जसे की आंबा रोपांचे वाटप आणि स्वच्छता मोहीमांमुळे पर्यावरण स्नेही उपक्रमांना चालना मिळत आहे आणि एकंदर समाजाच्या सर्वच वर्गांचे कल्याण साधले जात आहे.

हे सर्व कृषी उपक्रम शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षम करतात, उत्पन्नाचे विविध स्रोत त्यांच्यासाठी खुले करतात, शाश्वत आणि समृद्ध भविष्य घडवण्यासाठी आवश्यक संसाधने आणि ज्ञान उपलब्ध करून देतात.



# लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचे CSR उपक्रम: सक्षम समाजाच्या निर्मितीतून बदलते आहे लोकांचे जीवन

**लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (LIF) शिक्षण, आरोग्य, शेती आणि लोकसक्षमीकरणावर आधारित CSR उपक्रमांद्वारे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील समाजाच्या विकासासाठी भरीव योगदान देत आहे. स्थानिक लोकांच्या सक्रिय सहभागामुळे हे उपक्रम या लोकांच्या जीवनात दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवत आहेत.**






## उज्वल भविष्याची नवी आशा

- या संयुक्त प्रयत्नांमुळे LIF ने स्थानिक लोकांना उपजीविकेची नवीन साधने उपलब्ध करून दिली आहेत, त्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक सशक्त केले आहे आणि भविष्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन त्यांच्यामध्ये निर्माण केलेला आहे.
- प्रयत्नपूर्वक राबवलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने दाखवून दिले आहे की सामान्य जनतेला आर्थिक दृष्ट्या सक्षम केल्यास समाजाला परिवर्तनाच्या दिशेने नेता येणे शक्य आहे.

## शिक्षण आणि कौशल्य विकास

- शैक्षणिक सुविधा सुधारण्यासाठी, LIF ने नाकोडा, वढा, म्हातारदेवी, उसगाव, पांढरकवडा, शेणगाव आणि घुग्घुस येथील सात जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वितरण मोहीम राबवली. ज्यामध्ये 575 विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांसह लेखन साहित्य प्रदान करण्यात आले, तसेच प्रिंटर आणि प्रोजेक्टर यांसारख्या डिजिटल साधनांचाही समावेश होता. ही मोहीम विद्यार्थ्यांना अधिक सुसज्ज आणि प्रेरणादायी शिक्षणाचा अनुभव देण्यासाठी उपयुक्त ठरली आहे.
- चंद्रपूरमध्ये जी डी गोयंका लॉईड्स पब्लिक स्कूलची स्थापना केली, ज्यामध्ये CBSE शिक्षण दिले जाते. हे शाळा शिस्तबद्ध आणि सर्जनशील विद्यार्थ्यांना घडवत आहे.
- कौशल्य विकास कार्यक्रमात, LIF ने पांढरकवडा येथील युवकांना इलेक्ट्रिशियन, वायर बेंडिंग आणि वेल्डिंगसारख्या कौशल्यांमध्ये प्रशिक्षण देण्यासाठी 'प्रथम' NGO सोबत भागीदारी केली. या प्रशिक्षणाद्वारे 27 युवकांना स्वावलंबी बनवण्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आल्या.




## आरोग्यसेवांना बळकटी

- आरोग्य सेवा सुधारण्याच्या प्रयत्नांअंतर्गत LIF ने रक्तदान शिबिरे आयोजित केली आणि प्रॉस्थेटिक लिंब आणि दृष्टीसहाय्यक साधनांचे मोफत वितरण केले.
- नोव्हेंबर 2024 मध्ये 171 कृत्रिम अवयव आणि 609 चष्म्यांचे वितरित करत महावीर सेवा सदन समितीच्या सहकार्याने 780 लोकांना मदत केली.



## शेती आणि सक्षमीकरण



- शेतीसाठी LIF ने 11 ते 14 नोव्हेंबर 2024 दरम्यान जैन इरिगेशन, जळगाव येथे शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा आयोजित केला. यामध्ये ठिबक सिंचन, मृद विश्लेषण, पिकांचे विविधीकरण आणि शाश्वत शेती तंत्र शिकवण्यात आले.
- महिला शेतकऱ्यांसह अनेकांना आधुनिक शेतीविषयी ज्ञान आणि साधने मिळाल्याने उत्पादकता वाढवण्याची प्रेरणा मिळाली.
- किचन गार्डनिंग या अभिनव प्रकल्पाने महिलांना ताज्या भाज्या पिकवण्याचे तसेच अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचे साधन उपलब्ध झाले.
- बांबू रोपे आणि आंबा रोपांचे वितरण हे पर्यावरणपूरक तत्त्वांच्या प्रचारासह उत्पन्न वाढवण्यासाठी महत्त्वाचे ठरले आहे.
- LIF च्या स्वच्छता अभियानांपासून आंबा रोपे वितरणापर्यंत, या उपक्रमांनी पर्यावरण संवर्धन आणि समुदाय कल्याणामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

# लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचा कणा: समुदाय सक्षमीकरण करणारी आमची आउटरीच केंद्रे






**लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (LIF) ची आउटरीच केंद्रे (ORCs) आणि समर्पित आउटरीच वर्कर्स (ORWs) ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत आहेत. एकूण 21 गावांमध्ये कार्यरत ही केंद्रे गरजूंना फाउंडेशनच्या विविध उपक्रमांशी जोडणारी जीवनरेखा ठरत आहेत.**

## गावकऱ्यांचे पहिले संपर्क केंद्र

- ORWs हे गावकऱ्यांसाठी पहिल्या संपर्क केंद्राचे काम करतात. आउटरिच वर्कर्सच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्य सेवा, शिक्षण, आणि रोजगार अशा मूलभूत सुविधांचा लाभ मिळाला. आपत्कालीन वैद्यकीय सेवा समन्वयित करणे असो किंवा महिलांना लॉईड्स वन्या क्लोदिंग कंपनीमध्ये काम मिळवून देणे असो, आउटरिच वर्कर्स अखंडपणे समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी झटत असतात.
- आउटरिच वर्कर्स महिलांना कौशल्य प्रशिक्षणाद्वारे आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देण्याचे काम करतात, रोजगार अर्ज गोळा करतात आणि गरजू कुटुंबांना आरोग्य समस्या, गरिबी यांसारख्या अडचणींवर मात करण्यात मदत करतात.

## आशेची केंद्रे

- आउटरिच वर्कर्स म्हणजे LIF च्या उपक्रमांच्या यशाचा पाया आहेत. गावकऱ्यांना आधार देण्यासाठी आमची आउटरिच केंद्रे ठिकठिकाणी बनलेली आहेतच. ही केंद्रे एव्हाना गावकऱ्यांसाठी विश्वासाचे ठिकाण बनली आहेत. केंद्रांमध्ये मदत घेण्यासाठी गावकरी विश्वासाने येतात आणि आपल्या अडचणींवर उपाय शोधतात. आउटरिच वर्कर्स हे गावकरी आणि फाउंडेशनच्या सेवांना जोडणारा सेतू म्हणून कार्य करतात.

## शिक्षण व क्रीडाक्षेत्रात पुढाकार

- आउटरिच वर्कर्स स्थानिक मुलांना लॉईड्स राज विद्या निकेतन स्कूलद्वारे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देण्यास मदत करतात, तसेच त्यांना लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देतात. या माध्यमातून युवकांना प्रगती आणि यश मिळवण्यासाठी नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत. सेवा आणि योजनांबाबत जागरूकता पसरवून, आउटरिच वर्कर्स गावकऱ्यांना उज्ज्वल भविष्यासाठीच्या नवनवीन संधींबद्दल माहिती देतात.

## सकारात्मक बदलांची सुरुवात

- या उपक्रमांमुळे गावकऱ्यांच्या जीवनात झालेले सकारात्मक बदल स्पष्टपणे दिसून येत आहेत. आरोग्यसेवा, शिक्षण, रोजगार यासारख्या क्षेत्रांमध्ये विविध उपक्रमांचा लाभ ग्रामस्थांना देणारे आमचे ORWs गरिबीचे चक्र तोडण्यासाठी आणि लोकांना त्यांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. या अखंड पाठिंब्यामुळे, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि लोकांच्या वैयक्तिक सक्षमीकरणासाठी नवनवीन संधी निर्माण करण्यासाठी अधिक सक्षम झालेले आहे.

# अपंगाना मिळाले अवयव; तर शेकडोंना प्राप्त झाली नवी दृष्टी!

**लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचे मोफत कृत्रिम अवयव व दृष्टीसहाय्यता शिबीर संपन्न**

चंद्रपूर लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन, घुग्घुस एमआयडीसी औद्योगिक संघटना आणि कोलकाताच्या महावीर सेवा सदन यांच्या सहकार्याने मोफत कृत्रिम अवयव वितरण आणि दृष्टी बाधित सहाय्यता शिबिराचे आयोजन दिनांक 8 ते 12 नोव्हेंबर 2024 दरम्यान केले गेले. हे शिबीर चंद्रपूरच्या एमआयडीसी औद्योगिक संघटनेच्या प्रांगणात यशस्वीरीत्या संपन्न झाले. या उपक्रमामध्ये 171 लाभार्थ्यांना कृत्रिम हात, पाय आणि कॅलिपर प्रदान करण्यात आले, तसेच 609 लोकांना चष्मे वाटप करण्यात आले. अपंगत्व व दृष्टीदोष असलेल्या लाभार्थ्यांसाठी ही साधने त्यांच्या जीवन पुन्हा गतिमान आणि स्वावलंबी बनवण्यासाठी उपयुक्त ठरली.



## अपंगांसाठी आशेची किरण

या शिबिरामुळे अनेक लाभार्थ्यांना नवा आत्मविश्वास मिळाला. अनेकांनी त्यांच्या अनुभवांमधून सांगितले की, या साधनांच्या मदतीने त्यांचे दैनंदिन जीवन सुलभ झाले. एका शेतकऱ्याने पुन्हा शेती सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला, तर एका विद्यार्थिनीने शिक्षणात प्रगती साधण्याचा निश्चय बोलून दाखविला.

## सामूहिक प्रयत्नांची ताकद

शिबिराच्या यशस्वितेमध्ये स्वयंसेवक, वैद्यकीय तज्ञ आणि भागीदार संस्थांचे मोठे योगदान आहे. महावीर सेवा सदनच्या तंत्रज्ञान व एमआयडीसी औद्योगिक संघटनेच्या व्यवस्थापन सहाय्यामुळे ही सेवा सुरळीतपणे पूर्ण होऊ शकली. शिबिराच्या समावेशक दृष्टीकोनामुळे लाभार्थ्यांना फक्त शारीरिकच नव्हे, तर मानसिक व सामाजिक बळसुद्धा प्राप्त झाले.

## उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही वचनबद्ध

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने आपल्या या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू आणि अपंग व्यक्तींसाठी आवश्यक सुविधा पुरवण्याच्या आपल्या वाचनाची पुन्हा एका पूर्तता केली. या उपक्रमामुळे चंद्रपूरमधील समाजमन सकारात्मक भावनेने भरून आले. नवीन बदल घडवण्याची दिशाच जणूकाही निश्चित झाली. 12 नोव्हेंबर रोजी समारोप झालेल्या या शिबिराने चंद्रपूर जिल्ह्यातील जनमान सावर अमिट छाप सोडली. लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने आपल्या प्रत्येक उपक्रमातून कृतज्ञता, सक्षमीकरण आणि शाश्वततेच्या मूल्यांचा प्रचार केला आहे, ज्यामुळे अनेकांचे जीवन आशेने आणि प्रेरणेने उजळून निघाले आहे.

CMYK



# लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनतर्फे कोनसरीत शिक्षक दिन उत्सव



कोनसरी, ५ सप्टेंबर २०२४: लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोनसरी येथे शिक्षक दिन उत्सव साजरा करण्यात आला. कोनसरी आयर्न प्रकल्पाच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पोंसिब्लीटी प्रकल्पाची जोड लाभलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना दप्तरांचे (स्कूल बॅग्स) वाटप करून शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले गेले. या कार्यक्रमाचा लाभ इयत्ता पहिली ते चौथी मधील १४१ विद्यार्थ्यांना मिळाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. चंद्रशेखरराव वूरा (CEO, पेल्लेट प्लांट), श्री. श्रीकांत पवडे (सरपंच, कोनसरी) आणि श्री. रोजा चानेकर (उपाध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती) उपस्थित होते. याशिवाय शिक्षक, गावकरी, आणि CSR टीमच्या सदस्यांनी देखील कार्यक्रमात सहभाग घेतला.

## विद्यार्थ्यांकडून शिक्षकांना अनोखी मानवंदना

कार्यक्रमाला एक अनोखा रंग विद्यार्थ्यांनी भरला. काही विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे वेश परिधान करून प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. यामुळे त्यांच्या शिक्षकांप्रती असलेल्या कृतज्ञतेची झलक दिसून आली. पाहुण्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणांतून शिक्षणाचे महत्त्व आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यात त्याची भूमिका यावर भर दिला.

## विकसित समाजासाठी शिक्षणाच्या दिशेने पाऊल

स्कूल बॅग्स वितरणाच्या या मोहीमेच्या माध्यमातून स्थानिक मुलांच्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्याच्या दिशेने लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनची वचनबद्धताच अधोरेखित करते. स्थानिक समाजाला अधिकाधिक सक्षम बनविण्याच्या उद्देशाने केलेला हा उपक्रम कोनसरीतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची नवीन दारे उघडत आहे.



# कला आणि शिक्षणाच्या उपक्रमांसह 'बालदिन' उत्सव

कोनसरी, महाराष्ट्र – भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने कोनसरी येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात बालदिन उत्सव आयोजित केला. या कार्यक्रमात पिथा, कुद्री, मल्लमपडी आणि पुरसालगोंडी येथील खाणीच्या पाश्र्वभूमीतील आदिवासी गावांतील १०० हून अधिक मुलांचा सहभाग होता. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शिक्षण, बाल हक्क आणि सृजनशीलतेवर होता.



## चित्रकला स्पर्धेचे आयोजन

इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली चित्रकला स्पर्धा! "माझी शाळा, सुंदर शाळा" या विषयावर आधारित या स्पर्धेत एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या चिमुकल्या कलाकारांनी आपली सृजनशीलता दाखवली आणि शाळेच्या वातावरणाची सुंदर चित्रे काढली. श्रेया येलवाड (पहिला क्रमांक), चैतन्य गेडाम (दूसरा क्रमांक) आणि प्राची गुडेकर (तिसरा क्रमांक) यांना त्यांच्या उत्कृष्ट कामासाठी पारितोषिके देण्यात आली.

## कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचा सहभाग

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्री राकेश कावडो (उपसरपंच), श्री बाबुराव पुंगटी (पोलीस पाटील) आणि श्री विद्याधर मांडले (मुख्याध्यापक मल्लपडी) उपस्थित होते. शिक्षकवृंद आणि स्थानिक समाज नेत्यांसह लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या HR आणि CSR टीमचे सदस्यही उपस्थित होते.

## शिक्षण आणि बाल हक्कावर माहितीपूर्ण भाषणे

स्पर्धेच्या व इतर उपक्रमांच्या सोबतच, शिक्षणाचे महत्त्व आणि बाल हक्कांवरील माहितीपूर्ण भाषणेही देण्यात आली. याव्यतिरिक्त, एक प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली, ज्यात मुलांचे त्यांच्या गावाबद्दल आणि गावांतील प्रमुख व्यक्तींबद्दलचे ज्ञान तपासले गेले.

## शाळेतील उपस्थितीला प्रोत्साहन

शाळेतील उपस्थितीला प्रोत्साहन देण्यासाठी, प्रत्येक सहभागी मुलाला शाळेचे नवीन दप्तर प्रदान करण्यात आले. तसेच, सर्व मुलांना रुचकर मिठाई सुद्धा वाटप करण्यात आली. एकूणच सर्व बालगोपाळांसाठी हा दिवस त्यामुळे अधिकच संस्मरणीय झाला.

## संपूर्ण उपक्रमाचा परिणाम

बालदिनाचा उत्सव फक्त एक शैक्षणिक आणि स्पर्धात्मक कार्यक्रम नव्हता, तर या ग्रामीण भागात शिक्षण घेऊ पाहणाऱ्या बालकांचे कल्याण अधोरेखित करणारा एक अद्वितीय उपक्रम होता. या कार्यक्रमाने चिमुकल्यांच्या मनांवर सकारात्मक आणि दीर्घकालिक प्रभाव टाकला. यामुळे त्यांना उच्च शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आणि आपल्यातील सुप्त गुणांना जाणून घेण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.



# महात्मा गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम



२ ऑक्टोबर २०२४ रोजी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने आचार्य विनोबा भावे आश्रम शाळा, हेड्री येथे महात्मा गांधी आणि लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन केले. मुख्याध्यापक श्री. तोडेवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रतिष्ठित पाहुण्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सामाजिक जबाबदारी, तसेच साधी राहणी आणि उच्च विचारसरणी, हे मूल्य रुजविणे हाच होता.

पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या वयोगटानुसार प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांना या राष्ट्रीय नेत्यांच्या योगदानाबद्दल माहिती देण्यात आली. प्रश्नमंजुषा स्पर्धेत उत्तम प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. याव्यतिरिक्त, मुक्तिपथ एनजीओचे श्री. मल्लेरवार सर यांनी विद्यार्थ्यांना तंबाखूविरोधी शपथ दिली, ज्यामुळे एक निरोगी जीवनशैलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना नाश्त्याचे वाटप करून झाली. एकूणच या कार्यक्रमातून एक सामाजिक व सामूहिक जबाबदारीचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

## उपक्रमांचा प्रभाव

या विचारशील उपक्रमांद्वारे, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन गडचिरोलीमधील शिक्षण क्षेत्रावर सकारात्मक प्रभाव पाडत आहे. शालेय संसाधनांमध्ये गुंतवणूक करून, राष्ट्रीय नायकांचा सन्मान करून आणि शिक्षकांचा आदर व्यक्त करून, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन निरंतर सर्वांगीण विकासाचे नेतृत्व करत आहे. या माध्यमातून युवा मनांना सशक्त केले जात आहे आणि समाजात शिक्षण आणि प्रगतीचे महत्त्व रुजवले जात आहे.

# शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमाने ग्रामीण विद्यार्थ्यांना दिली प्रगतीची दिशा

ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अधिक उत्तम वातावरण आणि संधी मिळाव्यात या उद्देशाने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (LIF) ने चंद्रपूर जिल्ह्यातील सात जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात नकोडा, वढा, म्हातारदेवी, उसगाव, पांढरकवडा, शेणगाव आणि घुग्गुस या गावांमधील विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय शिक्षणासाठी आवश्यक संसाधने पुरवणे तसेच शिक्षणासाठी एक सकारात्मक वातावरण तयार करणे हा होता.

या वितरण कार्यक्रमामध्ये पहिली ते आठवीपर्यंतच्या 575 विद्यार्थ्यांना शालेय बॅग, बाके, पेन, नोटबुक्स, क्रीडा साहित्य यांसारख्या विविध शालेय वस्तू देण्यात आल्या. तसेच शिष्यवृत्ती पुस्तके, ग्रंथालय पुस्तके, संगणक, प्रिंटर्स, स्वच्छतेसाठी जलपात्र, कचरापेट्या आणि हँडवॉश अशा आवश्यक वस्तूही वितरित केले.

या कार्यक्रमात ग्राम पंचायत सदस्य, शैक्षणिक अधिकारी आणि लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड आणि लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या शैक्षणिक कार्यक्षमतेत सुधारणा व्हावी आणि सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे LIF च्या शालेय आणि सामाजिक विकासासाठीच्या वचनबद्धतेचे एक मोठे उदाहरणच प्रस्तुत झाले आहे.



CMYK



# क्रीडा क्षेत्रातील उत्तुंग भरारी: लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन आणि लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीचे अतुलनीय योगदान

**गडचिरोलीमध्ये क्रीडासंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन आणि लॉईड्स स्पोर्ट्स अकादमी यांनी मोलाचे योगदान दिले आहे. स्थानिक खेळाडूंच्या कौशल्याला विकसित करण्यासाठी आणि त्यांना प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळावी, यासाठी विविध स्पर्धा, मॅरेथॉन आणि आंतरगावीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांद्वारे फिटनेस, शिस्त आणि सामुदायिक भावनेला बळ मिळते.**




## गडचिरोली मॅरेथॉन : युवांनी रोवली विजयपताका

२० ऑगस्ट २०२४ रोजी गडचिरोली जिल्हा क्रीडा कार्यालयाने आयोजित केलेल्या गडचिरोली मॅरेथॉनमध्ये लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीच्या यश भांडेकर आणि रोहन भुरसे यांनी अनुक्रमे पहिली आणि दुसरी स्थाने पटकावली. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीने शिस्त आणि सहनशक्तीचे दर्शन घडवले. अॅथलेटिक्स मध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू घडवण्याचे ध्येय पुढे ठेवून या युवकांची वाटचाल सुरु आहे.

## जागतिक आदिवासी दिन मॅरेथॉन : सन्मान परंपरांचा

२० ऑगस्टलाच आयोजित जागतिक आदिवासी दिन मॅरेथॉन मध्ये निसर्ग, संस्कृती, आणि ऐतिहासिक वारशाचे महत्त्व साजरे करण्यात आले. यात लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीचा खेळाडू नागेश्वर रस्से चौथ्या स्थानी आला. त्याच्या कामगिरीने केवळ खेळाडूवृत्तीचे नव्हे, तर गडचिरोलीच्या आदिवासी वारशाच्या सांस्कृतिक अभिमानाचेही दर्शन घडवले.

## आंतरमहाविद्यालयीन क्रॉस-कंट्री स्पर्धा : राष्ट्रीय पातळीवर वाटचाल

५ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित आंतरमहाविद्यालयीन १० किलोमीटर क्रॉस-कंट्री स्पर्धेत लॉईड्स स्पोर्ट्स अकादमीच्या रोशन बोडलकरने प्रथम क्रमांक पटकावला, तर रोहन धुरसेने पाचवे स्थान मिळवले. दोघेही आता ऑल इंडिया युनिव्हर्सिटी क्रॉस-कंट्री २०२४ साठी पात्र ठरले आहेत. म्हणजेच त्यांचे क्रीडा क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील पदार्पण निश्चित झाले आहे.

## राष्ट्रीय निवड चाचण्यांमध्ये चमकले आमचे तिरंदाज

६ नोव्हेंबर २०२४ रोजी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनने ऑल इंडिया कॉलेज आर्चरी चॅम्पियनशिप २०२४-२५च्या निवड चाचण्यांमधील खेळाडूंच्या यशाचा उत्सव साजरा केला. यात साक्षी मकालवारने ३८० गुणांसह पहिले स्थान पटकावले, तर निखिल भोयरने ५६८ गुणांसह चौथे स्थान मिळवले. त्यांची ही यशस्वी कामगिरी मेहनत, अचूकता आणि फाउंडेशनने त्यांना पुरवलेल्या भक्कम आधाराची साक्ष देते.

## क्रीडा क्षेत्रातील उत्थानाचा वारसा

आपल्या अभिनव उपक्रमांद्वारे, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन आणि लॉईड्स स्पोर्ट्स अकादमी गडचिरोलीतील क्रीडा क्षेत्राला नवे आयाम देत आहेत. युवा प्रतिभांना प्रोत्साहन देणे, शारीरिक तंदुरुस्तीला प्रोत्साहन देणे, आणि सामुदायिक एकता मजबूत करणे, यांसाठी या उपक्रमांनी मोठे योगदान दिले आहे.

यश भांडेकर, रोहन भुरसे, रोशन बोडलकर, रोहन धुरसे, साक्षी मकालवार, आणि निखिल भोयर आणि त्यांच्याप्रमाणेच इतर अनेक युवा खेळाडूंनी मिळवलेले हे यश संपूर्ण समाजासाठीच प्रेरणादायी ठरले आहे. क्रीडामध्ये प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेले गन म्हणजे समर्पण आणि शिस्त! या गुणांना अंगी बाणवत या युवा खेळाडूंनी उत्कृष्ठ प्रदर्शन केले आहे. त्यांचे भविष्य निश्चितच उज्ज्वल असणार आहे.








## आंतरग्राम क्रिकेट स्पर्धा : सामुदायिक भावनांचे बळकटीकरण

२७ ते २९ ऑगस्ट २०२४ दरम्यान लॉईड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड आणि लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हेडरी गावात आंतरग्राम क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. १४ संघांच्या सहभागाने ही स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. हेडरी A संघाने विजेतेपद मिळवले, तर हेडरी B उपविजेते ठरले. पारसलगोंडी आणि मंगर संघांनी अनुक्रमे तिसरे व चौथे स्थान पटकावले. या स्पर्धेमुळे स्थानिक खेळाडूंना आपली कौशल्ये दाखविण्याची उत्तम संधी मिळाली.










# नव्या आशेचा नवा जन्म: लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलमध्ये १००व्या बाळाचे स्वागत

हेडरी







हेडरी गावातील लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलने अलीकडेच आपले १००वे बाळ सुरक्षितरित्या जन्माला आणण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. हा हृदयस्पर्शी क्षण होता. १०० बाळांचा जन्म हा केवळ एक आकडा नाही. त्याहीपलीकडे जाऊन, आरोग्याची काळजी, आई आणि बाळाची सुरक्षितता आणि लोकांच्या आरोग्यासाठी हे रुग्णालय सज्ज आहे, असा मोठा संदेश या माध्यमातून मिळाला. एक नवी आशा निर्माण झाली.

या विशेष प्रसंगी, रुग्णालयाने एका भावनिक समारंभाचे आयोजन केले. या समारंभात डॉक्टर्स, तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. एवढेच नव्हे तर, त्या सर्व कुटुंबांचाही सन्मान करण्यात आला, ज्यांनी आपल्या महत्त्वाच्या प्रवासात रुग्णालयावर विश्वास ठेवला आणि आपल्या बाळाला जन्म देण्यासाठी या रुग्णालयाची निवड केली.

### आईचा सन्मान आणि त्यांच्या प्रवासाला साथ

रुग्णालयात प्रस्तुत झालेल्या प्रत्येक मातेला एक विशेष बेबी किट भेट म्हणून देण्यात आले. ही भेट छोटीशी असली तरी अत्यंत अर्थपूर्ण अशी भेट होती. मातृत्वाचा प्रवास अत्यंत महत्त्वाचा असतो. या प्रवासाच्या पहिल्या टप्प्याचा आनंद घेता यावा यासाठी हे किट अत्यंत उपयोगी असणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित मातांचे हसरे चेहरे आणि त्यांच्यासोबत असलेली लहानगी हसतमुख बाळे रुग्णालयाच्या वातावरणात आनंद आणि कृतज्ञतेची भर घालत होते.

### वैद्यकीय तज्ज्ञांचा सन्मान

डॉ. प्रीती बुरीवार, डॉ. स्वाती रेड्डी, डॉ. उमेश उत्तरवार, आणि डॉ. चेतन बुरीवार यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे आणि रुग्णालयाच्या कामगिरीमुळे हेडरीतील आरोग्यसेवा अधिक सुरक्षित व विश्वासार्ह झाली आहे, यासाठी त्यांचे कौतुक करण्यात आले.

### स्थानिक नेत्यांचे योगदान

समारंभात तीन ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच आणि पोलीस पाटील उपस्थित होते. आरोग्यसेवा गावात सहज उपलब्ध करून देण्यासाठी आणि लोकांचा विश्वास मिळवण्यासाठी त्यांच्या योगदानाचा सुद्धा सन्मान करण्यात आला. या नेत्यांच्या उपस्थितीने रुग्णालय आणि स्थानिक जनतेचे नाते अधिक दृढ झाले असल्याचे दिसून आले.

### स्थानिकांना वाटला अभिमान

गावातील प्रमुख व्यक्ती श्री. रामजी गुंड्डु बांदे यांनी समारंभात सामील होऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांचे शब्द अभिमान आणि कृतज्ञतेने भारलेले होते. गावकरी, मान्यवर आणि येथे जन्म झालेल्या सर्व १०० बाळांची कुटुंबे यावेळी एकत्र आली. या माध्यमातून गावकऱ्यांनी केवळ १००व्या बाळाच्या जन्माचा आनंद साजरा केला नाही तर, या रुग्णालयाचा सन्मान आणि अभिमान असल्याचे नमूद केले. हे रुग्णालय म्हणजे आशेचा नवीन किरण आणि स्थानिकांच्या आरोग्यासाठी एक मोठा आधार बनलेला आहे, असेही अनेकांनी सांगितले.

### जनआरोग्य आरोग्य आणि रुग्णालयाचे अतूट नाते

१००व्या बाळाच्या जन्माचा हा उत्सव केवळ शतक गाठण्याचा आनंद नव्हता, तर हेडरीतील लोकांच्या रुग्णालयावरील अतूट विश्वासाचे ते प्रतीक होते. लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल हे केवळ आरोग्यसेवा केंद्र न राहता, लोकांच्या जीवनाचा भाग बनलेले आहे. हे नाते लोकांनी विश्वासाने जोडलेले आहे.

गावकऱ्यांसाठी हे रुग्णालय आता केवळ उपचारांचे ठिकाण नाही, तर नवी आशा आणि प्रेमळ काळजी देणारे जणूकाही दुसरे घरच आहे.

# आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळवून देणारे मोफत आरोग्य शिबिर

कोनसरी









११ सप्टेंबर २०२४, रोजी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या कोनसरी आयर्न प्रोजेक्टच्या सीएसआर विभागाने एक अभिनव आरोग्य शिबीर आयोजित केले होते. या मोफत आरोग्य शिबिरात आयुष्मान गोल्डन कार्ड साठी नोंदणी सुद्धा करण्यात आली. शिबिराला कोनसरीतील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचा उद्देश आवश्यक आरोग्य सेवा पुरविणे आणि आयुष्मान भारत योजनेचा लाभ स्थानिकांना मिळवून देणे असा होता.

### मोफत तपासणी आणि औषधांचे वितरण

या शिबिरादरम्यान ८२ लाभार्थ्यांना मोफत वैद्यकीय सल्ला देण्यात आला आणि आवश्यक औषधांचे वितरण सुद्धा मोफत करण्यात आले. थोडक्यात, ग्रामस्थांना कोणताही खर्च न करता त्यांच्या आरोग्य समस्या सोडवता आल्या.

### आयुष्मान गोल्डन कार्ड केवायसी प्रक्रियेत सहभाग

शिबिरादरम्यान आयुष्मान गोल्डन कार्डसाठी केवायसी प्रक्रिया राबविण्यात आली. यात तब्बल ११९ व्यक्तींनी नोंदणी पूर्ण केली. त्यामुळे त्यांना आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळणे आता सोपे होणार आहे. प्रस्तुत केवायसी प्रक्रिया १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत सुरू ठेवण्यात आली आधी अधिकाधिक ग्रामस्थानीं त्याचा लाभ घेतला.

### तज्ज्ञ डॉक्टर आणि कार्यक्षम टीमचे योगदान

या शिबिरात डॉ. शिल्पा गेडाम, डॉ. सेशराव भैसारे, डॉ. सुब्रत मेश्राम, डॉ. फैजान खान आणि डॉ. सोहेल शेख यांच्यासह लॅब टेक्निशियन, स्टाफ नर्स, एएनएम, सल्लागार, फार्मासिस्ट, आणि ईसीजी तंत्रज्ञ यांनी सहभाग घेतला आणि वैद्यकीय सेवा पुरवल्या.

आयुष्मान गोल्डन कार्ड केवायसी टीमचे नेतृत्व निलेश ढाकडे यांनी केले. त्यांनी नोंदणी प्रक्रिया सोपी करून ग्रामस्थांना त्यांचे गोल्डन कार्ड मिळविण्यासाठी मार्गदर्शन केले.

### जनता आणि सरकारी आरोग्य योजनांमधील मजबूत दुवा

नाविन्यपूर्ण अश्या या आरोग्य शिबिराने सुलभ आरोग्यसेवेचे महत्त्व लोकांना पटवून दिले. एवढेच नव्हे तर सामान्य नागरिकांना सरकारी आरोग्य योजनांचे लाभ मिळवून देऊन शासन आणि जनतेचे संबंध अधिक दृढ केले.

# लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

अहेरी







१ ऑक्टोबर २०२४, रोजी लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या वतीने अहेरी येथील उपजिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात ४९ रक्तदात्यांनी सहभाग घेतला. रक्तदान करून त्यांनी स्थानिक आरोग्यव्यवस्थेस हातभार लावला आणि यामाध्यमातून स्थानिकांना रक्तदानाचे महत्त्व देखील कळले.

उपजिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीतील तज्ज्ञांच्या मदतीने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या तज्ज्ञांनी रक्तसंकलनप्रक्रियेची सुरळीत अंमलबजावणी केली.

### विशेष मान्यवरांची उपस्थिती

शिबिरात आदरणीय श्री. मुरुगेशन सर (एलएमईएल), डॉ. रवींद्र वटगुरे (वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, अहेरी), मा. सरिता वाघ (लॅब टेक्निशियन, उपजिल्हा रुग्णालय, अहेरी), डॉ. वैभव मर्कम (वैद्यकीय अधिकारी, दवाखाना), आणि श्री. यश सोनंकार (स्टाफ, काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल, हेड्री) यांसारख्या मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### सामाजिक आरोग्य सेवेसाठी एक पाऊल पुढे

लोकांचे आरोग्य चांगले असावे आणि त्यांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्या हेच लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचे ध्येय आहे. प्रस्तुत रक्तदान शिबीर हे याच ध्येयाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल होते. अशा उपक्रमांमधून फाउंडेशन रक्तदानाबाबत जागरूकता निर्माण करत आहे आणि आरोग्य क्षेत्राला महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

### सामूहिक सहभागाचे यश

या उपक्रमाने केवळ रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले नाही, तर लोकांनी स्वतः सहभाग घेतल्यास सामाजिक आरोग्य सेवा कश्या मजबूत होऊ शकतात याचे यशस्वी उदाहरणही सादर केले आहे.

# महिलांच्या सक्षमीकरणाचा प्रवास: लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनचे परिवर्तनकारी उपक्रम

लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन (LIF) महिलांच्या सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी, शिक्षणासाठी आणि सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवत आहे. महिला कारागीरांना प्रोत्साहन देणे, शिक्षणाला पाठबळ देणे आणि पारंपरिक हस्तकला जोपासणे यामुळे अधिक समतावादी आणि सर्वसमावेशक समाज घडवण्याच्या दिशेने फाउंडेशन ठोस पावले उचलत आहे.





लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन: स्वप्ने साकारत, विजेत्यांना साथ देत – रितिका ठाकरेच्या बॅडमिंटन प्रवासाला प्रायोजकत्व.

## कौशल्यविकास आणि उद्योजकतेला चालना

औपचारिक शिक्षणाच्या पलीकडे जाउन, LIF ने महिलांसाठी कौशल्यविकास कार्यशाळा आयोजित केल्या आहेत, ज्यामुळे त्यांना उद्योजकतेकडे वळण्याची संधी मिळाली आहे. आंतरग्राम स्पर्धा आणि हस्तकला मेळावे अशा उपक्रमांनी महिलांना आपले कौशल्य प्रदर्शित करण्याचे, नेटवर्क तयार करण्याचे आणि आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचे व्यासपीठ दिले आहे.



## 'वन्या' उपक्रमाने घडवले उज्ज्वल भविष्य

'वन्या' या प्रमुख कार्यक्रमाद्वारे महिला कारागीरांना त्यांनी हाताने तयार केलेल्या वस्तूंसाठी राष्ट्रीय आणि शहरी बाजारपेठा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बांबू, खादी, आणि मातीपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक वस्तूंमुळे गडचिरोलीतील आदिवासी कलांचे राष्ट्रीय स्तरावर कौतुक झाले असून, महिलांसाठी शाश्वत उपजीविकेचे साधन निर्माण झाले आहे.

## सांस्कृतिक उत्सव : वारसा आणि सक्षमीकरणाचे दर्शन

- दिवाळी उत्सव आणि बिरसा मुंडा जयंती हे महिला कारागीरांच्या योगदान साजरे करण्यासाठी तसेच आदिवासी वारसा जपण्यासाठी प्रेरणादायक व्यासपीठ ठरले.
- या कार्यक्रमांमध्ये महिलांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक हस्तकलेच्या वस्तूंचे प्रदर्शना केले गेले. प्रदर्शनाच्या माध्यमातून या कलात्मक वस्तू व्यापक बाजारपेठांशी जोडल्या गेल्या. यामुळे महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत.
- सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे महिलांना केंद्रस्थानी ठेवत फाउंडेशनने समाजाला त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची जाणीव करून दिली आणि आदिवासी परंपरांचा वारसा भविष्यातही टिकवून ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले.

## नेतृत्वाला पाठबळ

फाउंडेशनच्या विविध उपक्रमांमुळे महिला केवळ उपजीविका मिळवत नाहीत, तर आपल्या समाजाचे नेतृत्व करण्याची जबाबदारीही पार पाडत आहेत. तज्ञांचे मार्गदर्शन, आर्थिक सहाय्य, आणि कौशल्यविकासाच्या संधींद्वारे LIF महिलांना त्यांच्या मार्गातील अडथळे दूर करून समाजात परिवर्तन घडवणाऱ्या नेत्या बनण्यास मदत करत आहे.

## आगामी वाटचाल

- महिला सक्षमीकरणाच्या या प्रवासाला आणखी विस्तार देऊन, जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचणे आणि पुढील पिढ्यांसाठी उज्ज्वल भविष्य घडवणे हे फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे.
- परंपरेला नावीन्याशी जोडत लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन आदिवासी आणि ग्रामीण भागातील महिलांसाठी आशेचा किरण बनले आहे.
- या उपक्रमांद्वारे फाउंडेशनने दाखवून दिले आहे की महिलांचे सक्षमीकरण हा केवळ एक उपक्रम नसून, संपूर्ण समाजाला परिवर्तनाच्या दिशेने नेणारी चळवळ आहे.

# पेठा गावात साजरा झाला 'आंतरराष्ट्रीय बालिका दिन' साजरा

१४ ऑक्टोबर रोजी पेठा गावाने आंतरराष्ट्रीय बालिका दिनाचे उत्साहात आयोजन केले. मुलींच्या हक्कांसाठी आणि सबलीकरणासाठी समर्पित असलेल्या या जागतिक दिनाचे औचित्य साधून, मुलींसाठी समान संधींचे महत्त्व सर्वांना सांगण्यात आले. यावेळी मुलींच्या समाजघडणीतील महत्त्वाच्या भूमिकेवरही प्रकाश टाकण्यात आला.

पेठा

**विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन**

या कार्यक्रमात पहिली ते पाचवीतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेद्वारे लहान मुलांना सर्जनशीलता व्यक्त करण्याची संधी मिळाली आणि मुलींच्या हक्कांबाबत जागरुकता निर्माण झाली.

चमचमणाऱ्या रंगांनी आणि कल्पक चित्रांच्या माध्यमातून मुलांनी सबलीकरण, समानता, आणि प्रत्येक मुलीच्या असीम क्षमतेबाबत आपले विचार व्यक्त केले.

**समानतेची कल्पना लहान वयात रुजवण्याचा प्रयत्न**

चित्रकला स्पर्धेने मुलांना एक आनंददायक आणि अर्थपूर्ण पद्धतीने स्त्रीपुरुष समानतेच्या संकल्पनेशी जोडले. या उपक्रमाने मुलांच्या कलात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन दिले, सुप्त गुणांना वाव दिला. आपल्या चित्रांमधून या मुलांनी नव्या आशा, महिला सशक्तीकरण, याचा संदेश दिला. प्रत्येक मुलीला स्वप्न पाहण्याचा अधिकार आहे, शिक्षणात आणि प्रगतीत कोणत्याही अडथळ्याशिवाय यशस्वी होण्याचा हक्क आणि बळ मुलींकडे आहे, असा संदेश चित्रांमधून मिळाला.

**समाजात बदल घडविण्याचे छोटे पण परिणामकारक पाऊल**

पेठा गावातील हा उत्सव छोटा असला, तरीही मुलींच्या आत्मविश्वासाला आणि धैर्याला चालना देणारा ठरला.

मुलींचे सबलीकरण म्हणजे केवळ संधी उपलब्ध करून देणे नव्हे, तर लहान वयापासून समानतेच्या मूल्यांची जाणीव निर्माण करणे आहे, हे देखील या उपक्रमातून जनमानसात रुजवले गेले.

पेठा गावाचा हा उत्सव मुलींना सक्षम बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक छोटे पण महत्त्वाचे पाऊल ठरला.





# परिवर्तनाची शेती : शेतकऱ्यांना सक्षम बनवणे आणि शाश्वत समुदायांची वाढ









लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या उत्पन्न निर्मिती उपक्रमांनी स्थानिक शेतीत सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. या उपक्रमाअंतर्गत ग्रामीण घरांमध्ये रांधणी बागकामाचे प्रमोशन करण्यात आले आहे. CSR टीमच्या सहाय्याने, आता ग्रामीण भागातील लोक आपल्या अंगणात पेस्टिसाईडमुक्त भाज्या पिकवत आहेत, ज्यामुळे त्यांना चांगली पोषणतत्त्वे मिळत आहेत आणि कुटुंबांसाठी अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत तयार झाले आहेत.

या उपक्रमाअंतर्गत, शेतकऱ्यांना विविध भाज्यांच्या बिया पुरविल्या जातात, जसे की काकडी, नाचणी, तुळशी, कारली, तुरटी, गोड गोळी, भोपळा आणि मल्याळम पालक. CSR टीम केवळ बिया पुरवत नाही, तर पिकांची वाढ आणि अंकुरणाचे मार्गदर्शन देखील प्रदान करते. भाज्या काढल्यानंतर, फाउंडेशन त्या शेतकऱ्यांकडून बाजार दरानुसार खरेदी करते, ज्यामुळे शेतकऱ्यांना नियमित उत्पन्न मिळते.

या शेतकऱ्यांना डिजिटल प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यासाठी त्यांचे बँक खाते उघडण्यात आले आहेत आणि त्यांना UPI वापरून पेमेंट्स कसे करायचे याचे प्रशिक्षण दिले गेले आहे. सप्टेंबर ते नोव्हेंबर 2024 दरम्यान, 411 किग्रॅ भाज्या खरेदी करण्यात आल्या असून, स्थानिक शेतकऱ्यांना ₹18,200 ची पेमेंट केली गेली आहे.

ताज्या भाज्या सुर्जागरह आयरन ओर माईन्सच्या कॅन्टीनमध्ये देखील पुरविल्या जात आहेत, ज्यामुळे कामगारांना पौष्टिक आणि स्थानिक भाज्या मिळत आहेत. हा 'फार्म-टू-फोर्क' उपक्रम फक्त स्थानिक शेतकऱ्यांना सक्षम बनवित नाही, तर समुदायासाठी अधिक चांगले आहार पर्यायही तयार करतो.

शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देऊन आणि थेट सहाय्य उपलब्ध करून देऊन, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशन स्वावलंबी समुदायांच्या वाढीला हातभार लावत आहे आणि ग्रामीण भागातील ताज्या, पौष्टिक अन्नाची उपलब्धता सुनिश्चित करत आहे.

CMYK


स्थानिक मुलांसोबत खेळाचा वेळ, जे आनंद घेत आहेत.


स्थानिक उपजीविकेतील एक महत्वाचा भाग – तेंदू पानांची गोळा करणे


स्थानिक जंगलातील स्वादिष्ट पदार्थ.


स्थानिक बांबू संरचनेद्वारे मासे वाळवले जात आहेत.



गावातील महिलांचा लग्न समारंभात आनंददायक वेळ.


आमचे अन्नदाते काम करत आहेत.


निसर्गाचा गहिरा मार्ग


गावाच्या घरामागे एक सुंदर सूर्यास्त.


एका निर्मळ गावाचे सभोवतालचे वातावरण.




उभे :-
१. भामरागड - इंद्रावती आणि प्राणहिता नद्यांचे संगमस्थळ.
४. खादी - भारताच्या स्वदेशी आंदोलनाचे प्रतीक आहे.
६. महिला - समाजसेवेचा एक महत्त्वाचा घटक.

आडवे :-
२. महाराष्ट्र - समृद्ध सांस्कृतिक वारशाला, विविध परंपरांना आणि प्रगतिशील विचारांना समर्पित असलेला राज्य.
३. गडचिरोली - नक्षलग्रस्त जिल्ह्या.
५. आदिवासी - गडचिरोली भागातील जंगलांचे रक्षण करणारे आणि पर्यावरणाचा समतोल राखणारे खरे रक्षक.
७. पोलाद - लोखंडाचा प्रकार.

**हे सोडवलेले क्रॉसवर्ड जवळच्या आउटरीच सेंटरकडे पाठवा, आणि पहिले १० विजेते निश्चित बक्षिसे मिळवतील.**

नाव :-

पत्ता :-

मोबाईल न. :-


# आमच्यासोबत आपले आरोग्यसेवा क्षेत्रातील करिअर उंचावून घ्या

आपण एक समर्पित आरोग्यसेवा व्यावसायिक आहात आणि अर्थपूर्ण योगदान देण्याची इच्छा आहे का? लॉईड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटल, लॉईड्स इंफिनाईट फाउंडेशनच्या अंतर्गत, आपल्याला आपल्या कौशल्य आणि आकांक्षांसाठी योग्य असलेल्या अनेक संधी देत आहे. आमच्या टीमचा भाग बना आणि रुग्णांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे समाधान अनुभवून घ्या.




## बालरोगतज्ज्ञ (Paediatrics)

- **शैक्षणिक पात्रता:** MBBS – MD/DCH (किमान)
- **भूमिका:** वैद्यकीय तपासणी, उपचार आणि समुपदेशन
- **अनुभव:** 0 ते 2 वर्षे
- **पगार:** अनुभवानुसार ठरवला जाईल
- **स्थान:** हेडरी, ता. एटापल्ली

## स्त्रीरोगतज्ज्ञ (Obstetrics and Gynecology)

- **शैक्षणिक पात्रता:** MBBS – MS/DGO (किमान)
- **भूमिका:** वैद्यकीय तपासणी, उपचार आणि समुपदेशन
- **अनुभव:** 0 ते 2 वर्षे
- **पगार:** अनुभवानुसार ठरवला जाईल
- **स्थान:** हेडरी, ता. एटापल्ली

## अस्थिरोगतज्ज्ञ (Orthopaedics)

- **शैक्षणिक पात्रता:** MBBS – MD Orthopaedics (किमान)
- **भूमिका:** वैद्यकीय तपासणी, उपचार आणि समुपदेशन
- **अनुभव:** 0 ते 2 वर्षे
- **पगार:** अनुभवानुसार ठरवला जाईल
- **स्थान:** हेडरी, ता. एटापल्ली

## ॲनेस्थिसिया तज्ज्ञ (Anaesthesia)

- **शैक्षणिक पात्रता:** MBBS – MD/MS Anaesthesia (किमान)
- **भूमिका:** रुग्णांच्या आरोग्याचे निरीक्षण, जाणीव पातळीचे नियमन
- **अनुभव:** 0 ते 2 वर्षे
- **पगार:** अनुभवानुसार ठरवला जाईल
- **स्थान:** हेडरी, ता. एटापल्ली

## वैद्यकीय अधिकारी (Medical Officer)

- **शैक्षणिक पात्रता:** MBBS (किमान)
- **भूमिका:** वैद्यकीय तपासणी, उपचार आणि समुपदेशन
- **अनुभव:** 1 ते 3 वर्षे
- **पगार:** अनुभवानुसार ठरवला जाईल
- **स्थान:** हेडरी, ता. एटापल्ली

**इच्छुक उमेदवारांनी आपला अद्ययावत CV skv@lloyds.in येथे पाठवा आणि आरोग्यसेवा क्षेत्रात समाधानकारक प्रवास सुरू करा.**


CMYK